IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# “समकालीन लोकशाहीवरील संकट: भांडवलशाही, सर्व्हिलन्स स्टेट आणि लोकांवरंजनवादाचा चिकित्सक अभ्यास”

**Dr. Meghraj Eknath Auti**
Head, Department of Political Science; Assistant Professor & Research Guide;
Research Centre Coordinator, R. B. Narayanrao Borawake College, Shrirampur (Autonomous)

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*आधुनिकता, भांडवलशाही, मार्क्सवाद, जॉर्ज ऑर्वेल, 1984, सर्व्हिलन्स, लोकशाहीचा ऱ्हास, लोकांवरंजनवाद, हेजेमनी, नागरी स्वातंत्र्य*

**ABSTRACT**

विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील जागतिक व्यवस्था वेगवान बदल, तंत्रज्ञानाचा विस्फोट, माहितीचे अतिसंचयन आणि जागतिक भांडवलशाहीच्या वाढत्या प्रभावामुळे मूलभूत मानवी मूल्यांच्या संकटात सापडलेली दिसते. विकास, प्रगती, डिजिटल प्रशासन आणि स्मार्ट व्यवस्थेच्या नावाखाली मानवी स्वातंत्र्य, गोपनीयता, सामाजिक न्याय, लोकशाही संस्थांची स्वायत्तता आणि नागरिकांच्या विवेकपूर्ण सहभागावर अनेक पातळ्यांवर मर्यादा निर्माण होत आहेत. धर्म, राष्ट्रवाद, बाजार आणि राज्यसंस्था यांचे नवे गठबंधन उदयास येत असून त्यामुळे लोकशाहीतील ‘लोकसत्ता’ ही संकल्पना दुर्बल बनत आहे.

या संदर्भात कार्ल मार्क्सची भांडवलशाहीवरील मूलगामी समीक्षा आणि जॉर्ज ऑर्वेलची ‘नाइन्टीन एटीफोर (1984)’ ही डिस्टोपियन दृष्टी आज अधिक समकालीन ठरते. मार्क्स भांडवलशाहीच्या आर्थिक-संरचनात्मक शोषणाकडे लक्ष वेधतो, तर ऑर्वेल आधुनिक सत्तेच्या सर्व्हिलन्सप्रधान व मानसिक गुलामगिरी निर्माण करणाऱ्या संरचनेकडे निर्देश करतो. हा संशोधन लेख आधुनिक भांडवलशाही, सर्व्हिलन्स स्टेट, लोकांवरंजनवादी नेतृत्वाचा उदय, लोकशाहीचे गुणवत्तात्मक अध:पतन, नागरी समाज–राज्यसंस्था यांतील वाढती दरी आणि व्यक्तीच्या आत्मविस्मरणाची प्रक्रिया यांचा चिकित्सक अभ्यास करतो. समकालीन भारत व जागतिक राजकारणाच्या संदर्भात लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक संस्थात्मक, सामाजिक आणि नैतिक उपायांचा शोध हा या लेखाचा केंद्रबिंदू आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Auti, M. E. (2026). समकालीन लोकशाहीवरील संकट: भांडवलशाही, सर्व्हिलन्स स्टेट आणि लोकांवरंजनवादाचा चिकित्सक अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 695–702.

**प्रस्तावना**

आजचे जग अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, माहिती-जाळे, डिजिटल व्यवहार, आंतरराष्ट्रीय बाजारपेठा आणि राज्यसत्तेचे केंद्रीकरण यामुळे मानवी जीवनाची चौकटच बदलून गेली आहे. एकीकडे विकासाचे आकर्षक शब्द—*'विकास', 'प्रगती', 'डिजिटल इंडिया', 'स्मार्ट सिटी'*—यांची सतत पुनरावृत्ती होत असते; पण दुसरीकडे नागरिकांचे स्वातंत्र्य, गोपनीयता, अभिव्यक्तीचा अधिकार, सामाजिक न्याय आणि लोकशाही संस्थांची आत्मनिर्भरता ढासळताना दिसते.

माहितीचे युग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या काळात माणूस 'अधिक जाणणारा' असला तरी 'अधिक अस्थिर' आणि 'अधिक नियंत्रित' होत असल्याची लक्षणे दिसतात. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती होत असतानाही द्वेषराजकारण, धार्मिक उन्माद, हिंसक संघर्ष, पर्यावरणीय विनाश, आर्थिक विषमता आणि मानसिक ताण वाढत आहे. हा विरोधाभास समजून घेण्यासाठी केवळ तांत्रिक किंवा आर्थिक विश्लेषण पुरेसे ठरत नाही; तर सत्ता, संस्कृती, विचार-नियंत्रण आणि मानवी वर्तन यांचे संयुक्त व चिकित्सक विश्लेषण आवश्यक ठरते. याच पार्श्वभूमीवर कार्ल मार्क्स आणि जॉर्ज ऑर्वेल यांचे विचार आज अत्यंत उपयुक्त ठरतात. मार्क्स भांडवलशाहीच्या अंतर्गत गतीने निर्माण होणारे शोषण, विषमता आणि विमुखता स्पष्ट करतो; तर ऑर्वेल आधुनिक सत्तेचे भयावह रूप—सर्व्हिलन्स, विचार-पोलीस, भाषिक नियंत्रण आणि सत्याच्या पुनर्रचनेद्वारे माणसाचे मानसशास्त्रीय गुलामगिरीकरण—यांचे चित्र उभे करतो.

**लोकशाही, मानवी समाज आणि मानवी वर्तन : एक मूलाधार**

राज्यशास्त्राच्या दृष्टीने लोकशाही ही केवळ घटनात्मक रचना किंवा निवडणुकीची प्रक्रिया नाही; ती मानवी समाजाच्या नैतिक-सामाजिक गुणवत्तेवर आणि मानवी वर्तनाच्या विवेकपूर्णतेवर उभी असलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीची यशस्वीता दोन मूलभूत घटकांवर अवलंबून असते—

1. समाजाची नागरिक-परिपक्वता, आणि
2. व्यक्तीचे नैतिक/विवेकशील वर्तन.

यामुळे लोकशाहीसाठी केवळ कायदे, संस्था किंवा प्रक्रिया पुरेशा ठरत नाहीत. लोकशाहीचा खरा प्राण म्हणजे **अधिकारांची जाणीव + कर्तव्यांची बांधिलकी + सहिष्णु संवाद + न्यायनिष्ठ जीवनशैली**. म्हणूनच लोकशाहीला "मानवी जीवनप्रणाली" म्हणणे अधिक योग्य ठरते.

समकालीन काळात लोकशाहीसमोरील सर्वात मोठा प्रश्न असा उभा राहतो की—लोकशाहीची बाह्य यंत्रणा टिकून आहे; परंतु तिचा अंतर्गत आत्मा म्हणजे नागरिक स्वातंत्र्य, संस्थात्मक उत्तरदायित्व आणि विवेकपूर्ण सहभाग कमकुवत का पडतो आहे?

**आधुनिकता : माहितीचा स्फोट की अर्थाचा ऱ्हास?**

आजच्या काळाला *Information Age* म्हटले जाते. परंतु माहितीचा वाढता प्रवाह नागरिकांना अधिक मुक्त करतो आहे की अधिक नियंत्रित करतो आहे, हा मूलभूत प्रश्न आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया, बिग डेटा, आर्टिफिशियल

इंटेलिजन्स, अल्गोरिदम आणि ट्रॅकिंग सिस्टिम्स यांद्वारे व्यक्तीच्या सवयी, निवडी आणि विचारांपर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. यातून आधुनिक समाजात "स्वातंत्र्य" हा शब्द अनेकदा केवळ इंटरफेसपुरता उरतो आणि वास्तविक नियंत्रण वाढत जाते. व्यक्तीला पर्याय उपलब्ध असल्याचा भास निर्माण होतो; पण त्या पर्यायांची चौकटच अनेकदा अल्गोरिदमिक व्यवस्थेद्वारे ठरवली जाते.

मार्क्सने ज्या **विमुखतेच्या (Alienation)** प्रक्रियेचे विश्लेषण केले, ती आधुनिक काळात अधिक तीव्र झालेली दिसते

- कामापासून विमुखता : श्रमातून अर्थ/आत्मसमाधान कमी होणे
- सर्जनशीलतेपासून विमुखता : कल्पकतेऐवजी यांत्रिकता वाढणे
- समाजापासून विमुखता : सतत कनेक्टेड असूनही आंतरिक एकाकीपणा
- स्वतःपासून विमुखता : स्वतःची ओळख 'ब्रँड/प्रोफाईल/प्रतिमा'पुरती सीमित होणे

अशा स्थितीत माणूस माहितीपूर्ण असूनही अस्थिर, आणि आधुनिक असूनही अर्थशून्य होत जातो—हीच आधुनिकतेची गंभीर विसंगती आहे.

**भांडवलशाही : मानवमुक्ती की 'आर्थिक गुलाम' तयार करणारी व्यवस्था?**

कार्ल मार्क्सच्या मते भांडवलशाहीचा मूलस्वभाव "मानवकेंद्री" नसून "नफाकेंद्री" आहे. या व्यवस्थेत माणूस हा मनुष्य म्हणून नव्हे, तर उत्पादनाचे साधन म्हणून पाहिला जातो. नफ्याच्या अनंत शर्यतीत—

- श्रमाचे शोषण वाढते
- उत्पादनवाढीसाठी निसर्गाचा ऱ्हास होतो
- मानवी नात्यांचे वस्तूकरण होते
- शिक्षण–आरोग्य–माहिती यांचे बाजारूकरण होते

समकालीन नवउदार भांडवलशाही (Neo-liberal Capitalism) व्यक्तीला "नागरिक" म्हणून नाही, तर **ग्राहक (Consumer)** म्हणून परिभाषित करते. व्यक्तीचे मूल्य तिच्या क्रयशक्तीशी जोडले जाते. परिणामी लोकशाहीतील समान संधीची संकल्पना दुर्बल होते आणि सामाजिक न्यायाची जमीन सरकते.

मार्क्सचा प्रश्न आजही तेवढाच मूलभूत आहे **"व्यवस्था माणसासाठी आहे की माणूस व्यवस्थेसाठी?"** याचे उत्तर केवळ अर्थव्यवस्थेत नसून लोकशाहीच्या भवितव्यात दडलेले आहे.

**धर्म, राष्ट्रवाद आणि बाजार : सत्तेचे नवे गठबंधन**

समकालीन राजकारणात धर्मनिरपेक्षतेऐवजी धार्मिक राष्ट्रवादाचा प्रभाव वाढताना दिसतो. धर्म अनेकदा अध्यात्माच्या जागी ओळखीचे राजकारण बनतो. मार्क्सने धर्माला "जनतेचे अफू" म्हटले होते, कारण धर्म शोषणाविरुद्ध उठणाऱ्या जाणिवेला

बोथट करू शकतो—विशेषतः जेव्हा तो सत्तेचा भाग बनतो.

आज अनेक देशांत धर्म, राष्ट्रवाद आणि बाजार यांचे नवे गठबंधन तयार होत आहे. त्याचे परिणाम म्हणून

- अल्पसंख्याकांचे राजकीय दुय्यमीकरण
- मतभेदांचे गुन्हेगारीकरण
- अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर मर्यादा
- असहमतीला देशद्रोह ठरवण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते.

लोकशाही ही "भिन्न मतांची सहअस्तित्व व्यवस्था" आहे. परंतु जेव्हा राजकारण "एकच मत" निर्माण करू पाहते, तेव्हा लोकशाहीचा आत्मा धोक्यात येतो.

### ऑर्वेलचे 'नाइन्टीन एटीफोर' : कल्पित डिस्टोपिया की वास्तवाचे प्रतिबिंब?

जॉर्ज ऑर्वेलची *'नाइन्टीन एटीफोर (1984)'* ही कादंबरी केवळ साहित्यिक कल्पनारंजन नाही; ती आधुनिक सत्तेच्या प्रवृत्तींचा आरसा आहे. **Big Brother, Thought Police, Surveillance, Newspeak, Doublethink** या संकल्पना आज प्रत्यक्ष सामाजिक-राजकीय अनुभवाशी मिळती-जुळती वाटतात. ऑर्वेलच्या जगात सत्ता केवळ "नियंत्रण" करत नाही, तर ती मनुष्याच्या **सत्य-जाणीवेचे पुनर्निर्माण** करते. इतिहास बदलला जातो, भाषेचे अर्थ बदलले जातात आणि व्यक्तीला स्वतःच्या विचारांवर शंका घ्यायला शिकवले जाते. आजच्या तंत्रज्ञानयुगात ***"Big Brother is watching you"*** हे वाक्य प्रत्यक्षात उतरल्यासारखे वाटते

- सीसीटीव्ही व डिजिटल देखरेख
- मोबाइल/लोकेशन ट्रॅकिंग
- सोशल मीडिया डेटा-प्रोफाइलिंग
- नागरिक डेटाबेस व डिजिटल ओळख प्रणाली यांद्वारे "दिसत नसलेले नियंत्रण" दैनंदिन जीवनात खोलवर रूजते.

### सत्ता : कल्याणासाठी साधन की स्वतःचाच अंतिम हेतू?

ऑर्वेलच्या मते दमनकारी सत्ता "कल्याणासाठी" सत्ता वापरत नाही; ती सत्ता टिकवण्यासाठी सत्ता वापरते. कादंबरीतील ओब्रायनचे विधान या संदर्भात अत्यंत सूचक ठरते **"The object of power is power."** ही सत्ता शरीरांपेक्षा अधिक प्रभावीपणे मनांवर राज्य करते. ती भीती, प्रचार, निवडक सत्य आणि भाषिक नियंत्रणाच्या माध्यमातून व्यक्तीला "स्वेच्छेने अधीन" बनवते.

या व्यवस्थेत नागरिकांना "सुरक्षेच्या नावाखाली" स्वातंत्र्यावर मर्यादा स्वीकारायला ला:-वले जाते. परिणामी सुरक्षा आणि स्वातंत्र्य यातील संतुलन बिघडते आणि लोकशाही "आतूनच" झिजू लागते.

**लोकांवरंजनवाद आणि लोकशाहीसमोरील आधुनिक आव्हाने**

समकालीन जगात लोकशाहीसमोरील एक मोठे आव्हान म्हणजे लोकांवरंजनवादी नेतृत्वाचा (Populism) उदय. अशा नेतृत्वात:-

- सत्तेचे व्यक्तिकेंद्रीकरण वाढते
- संस्थांपेक्षा नेत्याची प्रतिमा मोठी बनते
- गुंतागुंतीच्या प्रश्नांची भावनिक व सोपी उत्तरे दिली जातात
- विरोधक/असहमतीला शत्रू ठरवले जाते

लोकशाही नागरिकांना अधिकार देते; परंतु अधिकारांसोबत विवेक, जबाबदारी आणि संस्थांवरील विश्वास आवश्यक असतो. लोकांवरंजनवाद या तिन्ही घटकांना कमकुवत करतो आणि समाज "संवादातून" बाहेर पडून "ध्रुवीकरणाकडे" जातो.

**भारतीय संदर्भ : लोकशाही टिकून आहे, पण गुणवत्ता घटते आहे का?**

भारतामध्ये संसदीय लोकशाही कार्यरत असली तरी तिची गुणवत्तात्मक अवस्था अनेकदा चिंताजनक वाटते पुढील काही प्रमुख बाबींचा अभ्यास करता ते लक्षात येते.

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. नियमित निवडणुका, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, लिखित राज्यघटना, न्यायपालिका आणि संसदीय व्यवस्था या लोकशाहीच्या मूलभूत संस्था भारतात टिकून आहेत. तथापि, लोकशाहीचा अर्थ केवळ निवडणूक प्रक्रिया किंवा शासनकर्त्यांची निवड एवढाच नसून, लोकशाही ही एक मूल्याधिष्ठित व्यवस्था आहे—ज्यात **कायदा, मूलभूत अधिकार, संस्थात्मक समतोल, पारदर्शक प्रशासन, असहमतीचा अवकाश आणि नागरिकांचा समान सन्मान** यांना मध्यवर्ती स्थान असते. म्हणूनच, भारतात लोकशाही टिकून असली तरी तिची **गुणवत्ता** (quality of democracy) घटत आहे का, हा प्रश्न समकालीन राजकारणात अधिक तीव्रपणे उपस्थित राहतो.

**१) संसदीय लोकशाही आणि चर्चेचा ऱ्हास**

लोकशाहीची संसदीय व्यवस्था ही जनतेच्या प्रतिनिधित्वाची आणि सार्वजनिक चर्चेची प्रमुख जागा असते. परंतु समकालीन काळात संसदीय कामकाजात **गंभीर चर्चा, प्रश्नोत्तराद्वारे उत्तरदायित्व आणि विधेयकांवर सखोल विचारमंथन** या बाबींमध्ये अपेक्षित तीव्रता कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अनेकदा विधेयके जलदगतीने मंजूर होणे, चर्चेसाठी कमी वेळ मिळणे, तसेच संसदीय प्रक्रियांपेक्षा राजकीय रणनीतींना प्राधान्य मिळणे—या गोष्टी लोकशाहीच्या "संवादात्मक" आणि "उत्तरदायित्वाधिष्ठित" स्वभावाला मर्यादा आणतात.

**२) कार्यपालिकेचे केंद्रीकरण आणि संस्थात्मक समतोल**

भारतीय राज्यघटनेने सत्तेचे विभाजन व नियंत्रण (checks and balances) यावर भर दिला आहे. परंतु शासनयंत्रणेत निर्णयप्रक्रियेचे केंद्रीकरण वाढले तर विधिमंडळ, न्यायपालिका, प्रशासकीय स्वायत्त संस्था आणि स्थानिक स्वराज्य यांचा समतोल बिघडू शकतो. कार्यपालिकेचा वाढता प्रभाव हा लोकशाहीच्या दृष्टीने "कार्यक्षमता" वाढवतो असा दावा केला जातो; मात्र त्याचवेळी **संस्थात्मक उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि बहुपक्षीय चर्चेची जागा** कमी होण्याची शक्यता निर्माण होते. लोकशाहीचा

आत्मा हा केंद्रीकरणात नाही, तर विविध संस्थांच्या समन्वयात आणि परस्पर नियंत्रणात आहे.

**३) नागरी स्वातंत्र्य आणि असहमतीचा अवकाश**

लोकशाही व्यवस्थेत असहमती (dissent) ही समाजाच्या प्रगल्भतेची खूण असते. विचारांचे वैविध्य, धोरणांवरील टीका आणि सामाजिक आंदोलनांद्वारे नागरिक शासनाला प्रश्न विचारतात—ही लोकशाहीची आरोग्यदायी प्रक्रिया आहे. परंतु समकालीन काळात असहमतीला अनेकदा संशय, आरोप किंवा "देशद्रोह"सदृश नैरेटिव्हच्या चौकटीत पाहिले जाण्याची प्रवृत्ती दिसते. जेव्हा नागरिकांचा सहभाग भयावर आधारित होतो किंवा अभिव्यक्तीवर आत्मसंयम लादला जातो, तेव्हा लोकशाहीचा मूलभूत गाभा कमजोर होतो. त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या गुणवत्तेचा एक महत्त्वाचा निकष म्हणजे **अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि असहमतीची सुरक्षितता** हा ठरतो.

**४) न्यायपालिका, संस्था आणि लोकशाही विश्वास**

न्यायपालिका ही नागरिक हक्कांचे रक्षण करणारी आणि शासनावर अंकुश ठेवणारी संस्था आहे. लोकशाहीच्या गुणवत्तेसाठी न्यायालयीन स्वायत्तता, न्यायप्रक्रियेची गती, आणि घटनात्मक मूल्यांवरील ठाम भूमिका महत्त्वाची असते. याचप्रमाणे निवडणूक आयोग, माहिती आयोग, मानवाधिकार आयोग यांसारख्या स्वायत्त संस्थांचा निष्पक्ष व प्रभावी कार्यभार लोकशाहीच्या आरोग्यासाठी अनिवार्य आहे. संस्थांवरील जनविश्वास कमी झाला तर लोकशाहीमध्ये अनिश्चितता वाढू शकते आणि राजकीय ध्रुवीकरण तीव्र होऊ शकते.

**५) माध्यमांचे व्यापारीकरण, ध्रुवीकरण आणि "पोस्ट-ट्रुथ" वातावरण**

लोकशाहीत माध्यमे "चौथा स्तंभ" म्हणून जनमत घडवणे, प्रश्न उपस्थित करणे आणि सत्तेला उत्तरदायी ठेवणे ही भूमिका बजावतात. परंतु माध्यमांचे व्यापारीकरण, टीआरपी-केंद्रित कार्यक्रम, कॉर्पोरेट हितसंबंध आणि सोशल मीडिया-आधारित राजकीय प्रचारामुळे माहितीचा दर्जा आणि विश्वासार्हता प्रश्नांकित होऊ लागते. डिजिटल प्लॅटफॉर्मवरील अल्गोरिदम व्यक्तीला तिच्याच विचारांशी सुसंगत सामग्री अधिक दाखवत असल्याने **Echo Chamber** तयार होतो आणि समाजातील ध्रुवीकरण वाढते. परिणामी लोकशाहीचा संवाद "तर्काधिष्ठित" न राहता "भावनाधिष्ठित" होत जातो. ही स्थिती ऑर्वेलच्या "सत्याच्या पुनर्रचने"च्या कल्पनेशी काही अंशी सुसंगत वाटते.

**६) आर्थिक विषमता, बेरोजगारी आणि नागरिकत्वाचे संकट**

मार्क्सच्या चौकटीत पाहता, आर्थिक विषमता वाढली की लोकशाहीतील समान नागरिकत्वाचा अर्थ मर्यादित होतो. भारतासारख्या समाजात आर्थिक असमानता, बेरोजगारी, असुरक्षित रोजगार (उदा. गिग इकॉनॉमी), आणि मूलभूत सेवा (शिक्षण/आरोग्य) यांचे बाजारूकरण—या घटकांमुळे नागरिकांचे वास्तवातील स्वातंत्र्य कमी होते. आर्थिक दडपणाखाली असलेला नागरिक अनेकदा अधिकारांपेक्षा तात्कालिक गरजांवर अवलंबून राहतो. त्यामुळे लोकशाही केवळ मतदानापुरती न राहता **सामाजिक न्याय आणि आर्थिक सक्षमीकरणाशी** जोडणे अपरिहार्य ठरते.

**७) धार्मिक राष्ट्रवाद, ओळखीचे राजकारण आणि सामाजिक सलोखा**

भारताची लोकशाही विविधतेवर आधारित आहे. परंतु ओळखाधारित राजकारण, धार्मिक-जातीय ध्रुवीकरण आणि

समाजातील विभाजन वाढले तर लोकशाहीची समावेशकता (inclusiveness) कमकुवत होते. लोकशाही ही "बहुमताचे राज्य" असली तरी ती "अल्पमतांचे संरक्षण" आणि "सर्व नागरिकांचा समान सन्मान" यांवर उभी असते. म्हणूनच सामाजिक सलोखा, बहुसांस्कृतिक सहअस्तित्व आणि सहिष्णुता टिकवणे हे भारतीय लोकशाहीच्या गुणवत्तेचे अत्यंत महत्त्वाचे घटक ठरतात.
लोकशाहीचा अर्थ केवळ निवडणूक जिंकणे नसून कायदा, मूलभूत अधिकार, संस्थात्मक समतोल आणि नागरिकांचा समान सन्मान हा आहे. या निकषांवर लोकशाहीची कसोटी अधिक कठीण होत चालली आहे.

**फुकुयामा, रुसो, गांधी आणि हेजेमनी : समकालीन अर्थ**

फ्रान्सिस फुकुयामाने ***The End of History*** मध्ये उदार लोकशाहीचा विजय अंतिम असल्याचे सूचित केले. परंतु आज अनेक देशांत लोकशाही मूल्ये संकुचित होताना दिसतात; त्यामुळे "इतिहास संपला" हा आशावाद प्रश्नांकित होतो.
रुसोची ***"Back to Nature"*** ही भूमिका आज "नैतिक पुनरागमन" म्हणून अधिक अर्थपूर्ण वाटते भांडवलशाहीच्या अति स्पर्धा, स्वार्थ, उपभोगवाद आणि हिंसक संघर्षातून मानवी जीवनाला विवेकपूर्ण व नैतिक दिशा देण्याची गरज निर्माण होते.
महात्मा गांधींची ***'रामराज्य संकल्पना'*** धार्मिक राज्य नसून न्याय, समानता आणि नैतिक शासन यांवर आधारित आदर्श आहे. अहिंसा आणि साध्य-साधन शुचिता ही लोकशाही टिकवण्याची मूलतत्त्वे आहेत. तसेच **हेजेमनी (Gramscian perspective)** या संकल्पनेतून असे दिसते की सत्ता केवळ दडपशाहीने टिकत नाही, तर ती संस्कृती, शिक्षण, माध्यमे आणि सामान्य समजुती (Common Sense) यांच्या निर्मितीद्वारे समाजावर प्रभाव निर्माण करते. आज डिजिटल माध्यमे आणि बाजाराधिष्ठित संस्कृती या हेजेमनीला नवे बळ देतात.

**मार्क्स आणि ऑर्वेल : परस्परपूरक दृष्टिकोन**

मार्क्स आणि ऑर्वेल यांचे विश्लेषण वेगळे असले तरी ते परस्परपूरक ठरते ते म्हणजे मार्क्स आर्थिक संरचना आणि शोषण स्पष्ट करतो तर ऑर्वेल राजकीय सत्ता आणि मानसशास्त्रीय गुलामगिरी उघड करतो. मार्क्स हे "का" हे सांगतो तर ऑर्वेल "कसे" हे सांगतो. म्हणून समकालीन लोकशाहीसमोरील संकट समजून घेण्यासाठी दोघांची संयुक्त दृष्टी आवश्यक आहे. भांडवलशाही विषमता निर्माण करते आणि सर्व्हिलन्स स्टेट नागरिकांचे स्वातंत्र्य आकुंचित करते—या दोन्ही प्रक्रिया एकमेकांना पूरक बनून लोकशाहीला दुर्बल करतात.

**निष्कर्ष**

समकालीन जग ऑर्वेलियन डिस्टोपियाच्या दिशेने सरकत असल्याची भीती केवळ कल्पना नाही. सर्व्हिलन्स संस्कृती, डिजिटल नियंत्रण, भांडवलशाही विषमता, धार्मिक-राष्ट्रवादी ध्रुवीकरण आणि लोकांवरंजनवादी राजकारण यांमुळे लोकशाहीची गुणवत्ता कमी होण्याचा धोका वाढत आहे.

तरीही मार्क्सचा विचार मानवी मुक्तीची आशा देतो—कारण तो मानवी सर्जनशीलता, सामूहिकता, विवेक आणि न्यायाधारित समाजरचनेवर भर देतो. लोकशाही वाचवायची असेल तर खालील बाबी अपरिहार्य ठरतात—

१. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सामाजिक न्यायप्रधान धोरणे

२. सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी संस्थात्मक समतोल

३. सर्व्हिलन्स व डेटा-नियंत्रणावर पारदर्शकता आणि उत्तरदायित्व

४. नागरिक शिक्षण, मीडिया साक्षरता आणि विवेकपूर्ण सार्वजनिक संवाद

५. हिंसा-द्वेषाच्या राजकारणाऐवजी नैतिक लोकशाही संस्कृतीचा विकास

लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून मानवी समाज टिकवणारी नैतिक जीवनप्रणाली आहे. म्हणून लोकशाहीचे भवितव्य हे तंत्रज्ञानात किंवा बाजारात नसून मानवाच्या विवेक, नैतिकता आणि सामूहिक उत्तरदायित्वात आहे.

**संदर्भसूची (References)**

1. Marx, Karl. *Economic and Philosophic Manuscripts of 1844.*
2. Marx, Karl. *Das Kapital* (Vol. I).
3. Orwell, George. *Nineteen Eighty-Four.*
4. Orwell, George. *Animal Farm.*
5. Foucault, Michel. *Discipline and punish.*
6. Chomsky, Noam. *Manufacturing Consent.*
7. Habermas, Jürgen. *The Structural Transformation of the Public Sphere.*
8. Fukuyama, Francis. *The End of History and the Last Man.*
9. Rousseau, Jean-Jacques. *The Social Contract.*
10. Gandhi, M. K. *Hind Swaraj.*